# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १९८५ | विभागः आस्थापना
दिनांक : २३/०१/२०२३

**प्रस्तावाचा विषय** :- शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच फेज-२ प्रकल्पांतर्गत कार्यरत २३ कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- शासनाचा प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच. फेज-२ हा प्रकल्प वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राबविणेकरीता दिनांक २२/०९/२००९ रोजीच्या पत्रान्वये कृती आराखडा तयार करण्यास मंजूरी देण्यात आली होती. याकरीता महानगरपालिकेने प्रशासकिय ठराव क्र.४०६ दिनांक ०७/०४/२०१० नुसार सदर कामी मान्यता देण्यात आलेली असुन यासाठी एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी स्थापना करण्यास मंजूरी देण्यात आलेनुसार महानगरपालिकेच्या वसई विरार सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ फॅमिली वेल्फअर सोसायटीची स्थापना दिनांक २३/०६/२०१० रोजी करण्यात आली.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये आर.सी.एच. फेज-२ हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाद्वारे विविध ठिकाणी ९ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आली. यानुसार सद्यस्थितीत आर.सी.एच. फेज-२ प्रकल्पांतर्गत वरील प्रमाणे २३ कर्मचारी कार्यरत असून सदरचा कर्मचारी वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी व विस्तारित भागामध्ये आरोग्य सुविधा पोहंचविणे, माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे व सदर योजनेतंर्गत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम, नियमित लसीकरण, गरोदर मातांची नियमित तपासणी, राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम, जंतुनाशक व जिवनसत्व अ मोहिम, कुटूंब पाहणी सर्व्हे, जननी सुरक्षा योजना, रक्त नमुने, साथीबाबतचे मार्गदर्शन, शालेय आरोग्य तपासणी, प्रसूतीपूर्व नोंदणी, किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी व समुपदेशन, अंगणवाडीमधील बालकांची तपासणी, बालरोग व स्त्रीरोग तज्ञांचे मासिक तपासणी शिबीरे इ. विविध उपक्रम राबविले जात आहेत.

सबब सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता "रुग्णालय वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखा शिर्षाखाली रु.५०,००,००,०००/- इतकी तरतुद केलेली असुन यामधुन वसई विरार सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ फॅमिली वेल्फअर सोसायटीस या प्रकल्पांतर्गत कार्यरत २३ कर्मचाऱ्यांच्या (११ महिन्यांच्या) वेतनापोटी सन २०२३-२४ करीता अंदाजे रु.६०,७४,४८६/- इतका खर्च होणे अपेक्षित आहे.

सद्यस्थितीत तक्त्यामध्ये नमुद अ.क्र.१ ते २३ मध्ये नमुद केलेले २३ कर्मचारी हे प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आर.सी.एच. फेज-२ उपक्रमांतर्गत कार्यरत असल्याने संबधित सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन एप्रिल २०१४ पासून महानगरपालिकेकडून अदा करणेत येत आहे. सर्व कर्मचाऱ्यांना या योजनेप्रमाणेच सद्यस्थितीत ११ महिन्यांच्या करारतत्वाप्रमाणे १ दिवसाची सेवा खंडित करुन पुनश्चः ११ महिन्यांची करारतत्वावरील अस्थायी स्वरुपात सेवा सुरु ठेवण्यास व १०० टक्के अनुदान महानगरपालिकेकडून मिळणेबाबत दिनांक १९/०५/२०१४ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५ सभा सुचना क्र.१ नुसार सदर कामी मंजुरी देण्यात आली आहे व त्याप्रमाणे आजतागायत हया कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांनंतर १ दिवसाची सेवा खंडित करुन पुनश्चः ११ महिन्यांच्या करारतत्वावर दि.१८/०२/२०२२ ते दि.१७/०१/२०२३ पर्यंत पुर्ननियुक्ती देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत त्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक असुन २३ कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी होणाऱ्या खर्चाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत ठिकाण | पदनाम | निश्चित केलेले मासिक वेतन रुपये | ११ महिन्याचे वेतन रुपये | १३ टक्के ईपीएफ रु.१५०००/- वर वार्षिक रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीम.संगिता गोकुळ बेलदार | ना.प्रा.आ.केंद्र, दिवाणमान | जी.एन.एम. | ३५,४६६ | ३,९०,१२६ | २१,४५० | ४,११,५७६ |
| २. | श्रीम.किर्ती जितेंद्र वर्तक | ना.प्रा.आ.केंद्र, निदान, विरार प. | जी.एन.एम. | ३५,४६६ | ३,९०,१२६ | २१,४५० | ४,११,५७६ |
| ३. | श्रीम.रुचिता राजेंद्र पाटील | ना.प्रा.आ.केंद्र, चंदनसार | जी.एन.एम. | ३५,४६६ | ३,९०,१२६ | २१,४५० | ४,११,५७६ |
| ४. | श्री.निरंजन अशोक पाटील | आस्थापना विभाग, कक्ष-४,मुख्यालय | अकाऊंटंट | ३४,८६६ | ३,८३,५२६ | २१,४५० | ४,०४,९७६ |
| ५. | श्रीम.परिणिता अजय कोरे | आस्थापना विभाग, कक्ष-४,मुख्यालय | डे.एं.ऑपरेटर | १९,७८६ | २,१७,६४६ | २१,४५० | २,३९,०९६ |
| ६. | श्रीम.सविता नितीन तांबे | ना.प्रा.आ.केंद्र, निदान, विरार प. | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| ७. | श्रीम.रोशना गितेश म्हात्रे | ना.प्रा.आ.केंद्र, निदान, विरार प. | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| ८. | श्रीम.जान्हवी ना.शेंडामे | ना.प्रा.आ.केंद्र, चंदनसार | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| ९. | श्रीम.अक्षता पंकज वझे | ना.प्रा.आ.केंद्र, बिलालपाडा | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १०. | श्रीम.शिल्पा प्रविण दळवी | ना.प्रा.आ.केंद्र, चंदनसार | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| ११. | श्रीम.हेमाली बाबू खेडेकर | ना.प्रा.आ.केंद्र, आंबेडकर नगर | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १२. | श्रीम.दिपाली भूषण पाटील | ना.प्रा.आ.केंद्र, पाटणकर पार्क | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १३. | श्रीम.चित्रा आनंद पालव | ना.प्रा.आ.केंद्र, पाटणकर पार्क | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १४. | श्रीम.रेखा शिवनारायण झा | ना.प्रा.आ.केंद्र, वालिव | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १५. | श्रीम.सुषमा हरेश पालकर | ना.प्रा.आ.केंद्र, वालिव | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १६. | श्रीम.सुप्रिया अमेय हातीपकर | ना.प्रा.आ.केंद्र, दिवाणमान | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १७. | श्रीम.हेमलता संदिप साळोखे | ना.प्रा.आ.केंद्र, बऱ्हामपुर | ए.एन.एम. | २०,१८६ | २,२२,०४६ | २१,४५० | २,४३,४९६ |
| १८. | श्रीम.प्रेमांजली किरण अंभिरे | वै.आ.वि. मुख्यालय,विरार | कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक | १८,५०८ | २,०३,५८८ | २१,४५० | २,२५,०३८ |
| १९. | श्रीम.दर्शना मंगेश पाटील | ना.प्रा.आ.केंद्र, निदान, विरार प./ बोळिंज | कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक | १८,५०८ | २,०३,५८८ | २१,४५० | २,२५,०३८ |
| २०. | श्रीम.ज्योत्स्ना हरिश्चंद्र पाटील | ना.प्रा.आ.केंद्र, बऱ्हामपूर/नवघर पू. | कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक | १८,५०८ | २,०३,५८८ | २१,४५० | २,२५,०३८ |
| २१. | श्री.विलास दामोदर पाटील | ना.प्रा.आ.केंद्र, सातिवली/ जुचंद्र | कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक | १८,५०८ | २,०३,५८८ | २१,४५० | २,२५,०३८ |
| २२. | श्री.अजय गजानन घोडविंदे | ना.प्रा.आ.केंद्र, नारिंगी | शिपाई | १५,०३१ | १,६५,३४१ | २१,४५० | १,८६,७९१ |
| २३. | श्री.मल्लिकार्जुण गुरुपाद्या हिरेमठ | वै.आ.वि. मुख्यालय, विरार | शिपाई | १५,०३१ | १,६५,३४१ | २१,४५० | १,८६,७९१ |
| | | | एकूण | ५,०७,३७६ | ५५,८१,१३६ | ४,९३,३५० | ६०,७४,४८६ |

सदर २३ कर्मचाऱ्यांची मुदत दिनांक १७/०१/२०२३ रोजी संपत आहे. त्यामुळे त्यांना दिनांक १८/०१/२०२३ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन त्यांची दिनांक १९/०१/२०२३ पासुन ते दिनांक १८/१२/२०२३ पर्यंत (११ महिने) सेवा सुरु ठेवण्यास त्यांच्या वेतनापोटी अंदाजित रु.६०,७४,४८६/- (रुपये साठ लाख चौऱ्याहत्तर हजार चारशे शहाऐंशी मात्र) इतक्या येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिकेत शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच. फेज-२ या कार्यक्रमांतर्गत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या २३ कर्मचाऱ्यांची सेवा दि.१८/०१/२०२३ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि.१९/०१/२०२३ ते दि. १८/१२/२०२३ (११ महिने फक्त) सुरु ठेवणेस व त्यांच्या वेतनापोटी येणाऱ्या अंदाजित रु.६०,७४,४८६/-(रुपये साठ लाख चौऱ्याहत्तर हजार चारशे शहाऐंशी मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे .

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स — ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९८८६ — विभाग : आस्थापना कक्ष ४

दिनांक :२३/०१ /२०२३

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, ना.प्रा.आ.केंद्रे, दवाखाने, कोव्हीड-१९ रुग्णालये, वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी दरमहा ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने थेट मुलाखतीद्वारे नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त होत असल्याने त्यांची सेवा समाप्ती करणे व १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कार्यरत पदांचे पुढील महिन्यासाठी पुर्ननियुक्ती करणेस व याकामी मानधनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर**:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय-वसई, विजयनगर-तुळींज रुग्णालय, चंदनसार रुग्णालय, कौल सिटी रुग्णालय, सोपारा सामान्य रुग्णालय, बोळिंज रुग्णालय, सामान्य रुग्णालय- जुचंद्र अशी एकुण ७ रुग्णालये तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, २ माताबाल संगोपन केंद्रे, क्षयरोग विभाग व ६ दवाखाने कार्यान्वीत आहेत.

सदर ठिकाणी खालील **तक्ता "अ"** मध्ये नमुदप्रमाणे सन-२०१३ पासून वेळोवेळी वैद्यकीय आरोग्य विभागाने ६ महिने कंत्राटी तत्वावर (२२ संवर्गात) एकूण ५३८ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत पदे (६ महिने कंत्राटी तत्वावर) सन २०२० पासून (१३ संवर्गात) एकूण ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, आर.सी.एच. अंतर्गत कंत्राटी पदे सन २०१२ पासून (५ संवर्गात) एकूण २३ कर्मचारी व तसेच कंत्राटी तत्वावर एन.यु.एच.एम. अंतर्गत कंत्राटी पदे सन २०१६ पासून (९ संवर्गात) एकूण ६७ अश्याप्रकारे वैद्यकीय आरोग्य विभागात (२२ संवर्गात) एकूण ९५१ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

<u>तक्ता "अ"</u>

| अ. क्र. | संवर्ग | वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत पदे (६ महिने कंत्राटी तत्वावर) सन-२०१३ पासून वेळोवेळी | | | कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत पदे (६ महिने कंत्राटी तत्वावर) सन २०२० पासून | आर.सी.एच. अंतर्गत कंत्राटी पदे सन २०१२ पासून | एन.यु.एच.एम. अंतर्गत कंत्राटी पदे शासनाचे सन २०१६ पासून व मनपाचे सन २०१७ पासून | एकूण कार्यरत पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण कार्यरत पदे | कोर्टात दावा दाखल केलेले | कोर्टात दावा दाखल न केलेले | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| १ | भिषक | ५ | ३ | २ | २ | ० | ० | ७ |
| २ | स्त्रीरोग तज्ञ | ११ | ४ | ७ | ३ | ० | ० | १४ |
| ३ | पॅथॉलॉजीस्ट | २ | २ | ० | ० | ० | ० | २ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | बालरोग तज्ञ | ८ | ३ | ५ | १ | ० | ० | **९** |
| ५ | अस्थिरोग तज्ञ | २ | १ | १ | ० | ० | ० | **२** |
| ६ | शल्य चिकित्सक | २ | ० | २ | ० | ० | ० | **२** |
| ७ | कान, नाक, घसा तज्ञ | २ | ० | २ | ० | ० | ० | **२** |
| ८ | नेत्र शल्यचिकित्सक | १ | ० | १ | १ | ० | ० | **२** |
| ९ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | २ | ० | २ | ० | ० | ० | **२** |
| १० | नेफ्रॉलॉजीस्ट | १ | ० | १ | ० | ० | ० | **१** |
| ११ | मायक्रोबॉयोलॉजीस्ट (डिग्री) | ० | ० | ० | १ | ० | ० | **१** |
| १२ | मायक्रोबॉयोलॉजीस्ट (डिप्लो.) | ० | ० | ० | १ | ० | ० | **१** |
| १३ | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस | ५ | ३ | २ | ४ | ० | ५ | **१४** |
| १४ | वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस | ७३ | ६७ | ६ | ४३ | ० | ० | **११६** |
| १५ | पी.एच.एन (सार्वजनिक आरोग्य परिचारीका) | ५ | ५ | ० | ० | ० | ० | **५** |
| १६ | जी.एन.एम (अधिपरिचारीका) | १३२ | १३१ | १ | १०६ | ३ | १९ | **२६०** |
| १७ | ए.एन.एम (प्रसविका) | १८७ | १७८ | ९ | १०५ | १२ | ० | **३०४** |
| १८ | फार्मासिस्ट | ३६ | ३५ | १ | २१ | ० | १४ | **७१** |
| १९ | प्रयोगशाळा सहाय्यक/ तंत्रज्ञ | ४१ | ३८ | ३ | २४ | ० | १६ | **८१** |
| २० | क्ष-किरण सहाय्यक | ८ | ४ | ४ | ११ | ० | ० | **१९** |
| २१ | शितसाखळी तंत्रज्ञ | १ | ० | १ | ० | ० | ० | **१** |
| २२ | डायलिसिस सुपरवायझर | १ | १ | ० | ० | ० | ० | **१** |
| २३ | डायलिसिस टेक्निशीयन | ८ | २ | ६ | ० | ० | ० | **८** |
| २४ | समुपदेष्टा/समाजसेवक | ५ | ५ | ० | ० | ० | ० | **५** |
| २५ | अकाऊंटंट RCH | ० | ० | ० | ० | १ | ० | **१** |
| २६ | डाटा एन्ट्री ऑपरेटर/ कम अकाऊंटंट | ० | ० | ० | ० | १ | ५ | **६** |
| २७ | कनिष्ठ लिपिक तथा संगणक चालक RCH | ० | ० | ० | ० | ४ | ० | **४** |
| २८ | शिपाई / अटेंन्डट | ० | ० | ० | ० | २ | ३ | **५** |
| २९ | शहर लेखा व्यवस्थापक | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| ३० | कार्यक्रम सहायक | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| ३१ | लसिकरण सहाय्यक | ० | ० | ० | ० | ० | ३ | **३** |
| | **एकूण** | **५३८** | **४८२** | **५६** | **३२३** | **२३** | **६७** | **९५१** |

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेले विविध रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र, दवाखाने आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी वेळोवेळी मान्यता दिलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारानुसार तात्पुरत्या स्वरुपात ६

महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या मानधनावर वेळोवेळी दिलेल्या कार्यादेशानुसार विविध विषयाचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.), वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.), पी.एच.एन, जी.एन.एम, ए.एन.एम, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक, शितसाखळी तंत्रज्ञ, समुपदेष्टा, समाजसेवक, डायलिसिस सुपरवायझर, डायलिसिस तंत्रज्ञ इत्यादी संवर्गातील वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

त्यानुसार सद्यस्थितीत वैद्यकीय आरोग्य विभागात ६ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर सन- २०१३ पासून वेळोवेळी वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत ६ महिने कंत्राटी तत्वावर (२२ संवर्गात) एकूण ५३८ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी व तसेच कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत पदे (६ महिने कंत्राटी तत्वावर) सन २०२० पासून (१३ संवर्गात) एकूण ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा तपशील खालील **तक्ता "ब"** मध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता "ब"**

| अ.क्र | पद | दर महा मानधन रुपये | आकृतीबंधानुसार मंजूर पदे | मनपा वैद्यकीय आरोग्य विभागासाठी ६ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी सन २०१३ पासून वेळोवेळी | मनपा कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी (६ महिने कंत्राटी तत्वावर) सन २०२० पासून | सद्यस्थितीत कार्यरत वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| १ | भिषक | ८५००० | ४ | ५ | २ | ७ |
| २ | स्त्रीरोग तज्ञ | ८५००० | ४ | ११ | ३ | १४ |
| ३ | पॅथॉलॉजीस्ट | ८५००० | २ | २ | ० | २ |
| ४ | बालरोग तज्ञ | ८५००० | ४ | ८ | १ | ९ |
| ५ | अस्थिरोग तज्ञ | ८५००० | २ | २ | ० | २ |
| ६ | शल्य चिकित्सक | ८५००० | २ | २ | ० | २ |
| ७ | भूलतज्ञ (बधिरीकरणतज्ञ) | ८५००० | ४ | ० | ० | ० |
| ८ | कान, नाक, घसा तज्ञ | ८५००० | २ | २ | ० | २ |
| ९ | नेत्र शल्यचिकित्सक | ८५००० | २ | १ | १ | २ |
| १० | मानसोपचार तज्ञ | ८५००० | २ | ० | ० | ० |
| ११ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | ८५००० | २ | २ | ० | २ |
| १२ | रेडिओलॉजीस्ट | ८५००० | २ | ० | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | नेफ्रॉलॉजीस्ट | ८५००० | ० | १ | ० | १ |
| १४ | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस | ७५००० | ४७ | ५ | ४ | ९ |
| १५ | वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस | ५०००० | २७ | ७३ | ४३ | ११६ |
| १६ | पी.एच.एन (सार्वजनिक आरोग्य परिचारीका) | ३५१०० | ० | ५ | ० | ५ |
| १७ | जी.एन.एम (अधिपरिचारीका) | ३४८०० | १४९ | १३२ | १०६ | २३८ |
| १८ | ए.एन.एम (प्रसविका) | १९७०० | १२५ | १८७ | १०५ | २९२ |
| १९ | फार्मासिस्ट | २०८०० | ३ | ३६ | २१ | ५७ |
| २० | प्रयोगशाळा सहाय्यक | १८७०० | ० | ४१ | २४ | ६५ |
| २१ | क्ष-किरण सहाय्यक | १८७०० | ० | ८ | ११ | १९ |
| २२ | शितसाखळी तंत्रज्ञ | १९७०० | ० | १ | ० | १ |
| २३ | डायलिसिस सुपरवायझर | ३४८०० | ० | १ | ० | १ |
| २४ | डायलिसिस टेक्निशीयन | ३४८०० | ० | ८ | ० | ८ |
| २५ | समुपदेष्टा/ समाजसेवक | ३४८०० | ० | ५ | ० | ५ |
| २६ | मायक्रोबॉयोलॉजीस्ट | ११५५०० | ० | ० | १ | १ |
| | | ८९२५० | | | १ | १ |
| | **एकूण** | | **३८३** | **५३८** | **३२३** | **८६१** |

तक्ता "अ" मध्ये रकाना क्र. ९ मध्ये विविध ३१ संवर्गात एकूण ९५१ **वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वैद्यकीय आरोग्य विभागात कार्यरत आहेत.**

तक्ता "ब" मध्ये रकाना क्र. ०५ मधील ६ महिने कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात **सन २०१३ पासुन महानगरपालिकेत वेळोवेळी दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशानुसार कार्यरत आहेत.** कार्यरत **५३८ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ४८२ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वसई विरार शहर महानगरपालिका विरोधात याचिका क्र.४०७९/२०२१, ४०८०/२०२१, ४०८३/२०२१, ४०८५/२०२१, ४०८७/२०२१, ४०८८/२०२१, ४०९०/२०२१, ४०९१/२०२१, ४०९२/२०२१, ४०९४/२०२१, ६०३२/२०२१, १४९७१/२०२१, १४५६०/२०२१ दाखल असुन सदर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी सोबत सादर करण्यात आलेली आहे.**

**मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या ४८२ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने त्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा पुनर्नियुक्ती बाबतचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर करण्यात येईल.**

सबब मा. प्रशासकीय ठराव क्र.४३, दि.१३/०४/२०२२ अन्वये पुर्ननियुक्ती दिलेनुसार सन-२०१३ पासून वेळोवेळी कार्यरत असलेले एकूण ५३८ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेले ४८२ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वगळता उर्वरित **मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल न केलेले** स्त्रीरोग तज्ञ- ०७, बालरोग तज्ञ- ०५, भिषक-०२, अस्थीरोग तज्ञ-०१, शल्यचिकित्सक- ०२, नेफ्रोलॉजीस्ट- ०१, त्वचा व गुप्तरोग तज्ञ-०२, कान-नाक-घसा तज्ञ- ०२, नेत्रशल्यचिकित्सक-०१, एम.बी.बी.एस.- ०२, बी.ए.एम.एस.-०६, जी.एन.एम.- ०१, ए.एन.एम.- ०९, फार्मासिस्ट- ०१, प्रयोगशाळा सहाय्यक- ०३, क्ष-किरण सहाय्यक- ०४, शितसाखळी तंत्रज्ञ- ०१, डायलिसिस तंत्रज्ञ- ०६ अश्या **एकूण ५६ कर्मचाऱ्यांचा ६ महिन्याचा कंत्राटी सेवा कालावधी दि.१८/१०/२०२२ रोजी समाप्त होत आहे.**

तसेच तक्ता "ब" मधील रकाना क्र.०६ मध्ये कोव्हीड-१९ अंतर्गत सन २०२० पासून थेट मुलाखतीद्वारे ६ महिने कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या एकूण ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा ६ महिन्याचा कंत्राटी सेवा कालावधी दि.१३/०४/२०२२ रोजी संपुष्टात आल्याने मा. प्रशासकीय ठराव क्र.४३, दि.१३/०४/२०२१ अन्वये पुर्ननियुक्ती दिलेनुसार सद्यस्थितीत कार्यरत असलेले सोबत जोडलेल्या प्रपत्र 'ब' मधील तक्ता क्र.०१ ते तक्ता क्र.०७ मध्ये नमुद मायक्रोबायोलॉजीस्ट- ०२, स्त्रीरोग तज्ञ- ०३, भिषक- ०२, बालरोग तज्ञ- ०१, नेत्रशल्यचिकित्सक- ०१, एम.बी.बी.एस.-०४, बी.ए.एम.एस.- ४३, जी.एन.एम.- १०६, ए.एन.एम.-१०५, फार्मासिस्ट- २१, प्रयोगशाळा सहाय्यक- २४, क्ष-किरण सहाय्यक- ११ या एकूण ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा **६ महिन्यांचा कंत्राटी सेवा कालावधी दि.१८/१०/२०२२ रोजी समाप्त होत आहे.**

**सबब उक्त सादर प्रमाणे मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल न केलेले सन-२०१३ पासून वेळोवेळी कार्यरत असलेले ५६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी व कोव्हीड-१९ अंतर्गत सन-२०२० पासून कार्यरत ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी अश्या एकूण ३७९ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा ६ महिन्याचा कंत्राटी सेवा कालावधी दि.१८/१०/२०२२ रोजी समाप्त होत आहे.**

सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात कोव्हीड-१९ कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव कमी झाल्याने कोव्हीड-१९ अंतर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत ३२३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची सेवेची आवश्यकता आहे किंवा नाही व त्यांची पुर्ननियुक्ती करावी किंवा कसे ? याबाबत वैद्यकीय आरोग्य विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे, असे मत आहे.

मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार जे कर्मचारी कमी करावे लागतील त्यांचेबाबत Hon H/C मध्ये काही Petition दाखल आहे काय? तपासून सादर करावे असे निर्देश दिलेनुसार विधी विभागाकडे नस्ती पाठविण्यात आली होती. त्याबाबत विधी विभागाने एकुण ४९६ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याबाबत याचिकाकर्त्यांची नावे पदनामानूसार उपलब्ध करुन दिलेली आहेत.

विधी विभागाकडून प्राप्त यादीनुसार ४९६ पैकी ४८८ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांनी यापूर्वीच न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. सन २०१३ पासून महानगरपालिकेत वेळोवेळी दिलेल्या पुर्ननियुक्ती आदेशानुसार कार्यरत वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांनी ६ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर पुर्ननियुक्ती द्यावयाचे ५६ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांपैकी विविध संवर्गातील ८ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांनी नव्याने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याचे दिसून येते.

सद्यस्थितीत महानगरपालिकेचे ६ महिने कंत्राटी तत्वावरील ५६ वैद्यकीय अधिकारी / पॅरामेडिकल कर्मचारी व कोव्हीड-१९ अंतर्गत ३२३ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी अशा एकुण ३७९ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांना ६ महिन्याकरीता पुर्ननियुक्ती देणेबाबत टिपणी प्रस्तावित आहे.

तथापी कोव्हीड- १९ अंतर्गत कार्यरत १) डॉ.निता खोब्रागडे बी.ए.एम.एस. यांनी गर्भसमाप्ती अधिनियम १९७१ नुसार नोंदणीकृत गर्भपात केंद्र नसतांना तसेच नोंदणीकृत डॉक्टरांची शैक्षणिक अर्हता नसतांना अथवा गायनेकॉलॉजीस्ट नसतांना अवैधरित्या गर्भपातच्या गोळया रुग्णांना दिलेल्या होत्या म्हणुन महानगरपालिकेमार्फत त्यांच्या विरुध्द मा.न्यायालयात याचिका दाखल असलेने त्यांची सेवा मा.अति.आयुक्त (द.) यांच्या जा.क्र व.वि.श.म/आस्था/१४७४/२०२२ दि.१६/११/२०२२ आदेशान्वये त्यांची सेवा पूर्वलक्षीप्रभावाने दि. १८/१०/२०२२ पासून समाप्त करण्यात आली आहे. २) श्रीम.तेजस्विनी कोकीतकर, पद- प्रयोगशाळा सहाय्यक यांनी दि.१७/१०/२०२२ रोजी कंत्राटी करार पुढे न वाढवणेबाबत अर्ज दिला आहे. ३) डॉ.प्रियांशी मालपाणी पद-वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, ४) श्रीम.हर्षिता सिंग पद- एक्सरे टेक्निशियन व ५) श्री.चिराग मडबी पद- फार्मासिस्ट हे दि.१८/१०/२०२२ रोजीपासून कोणतीही पूर्वसुचना न देता आजपर्यंत कर्तव्यावर गैरहजर आहेत. त्यामुळे कोविड-१९ अंतर्गत सद्यस्थितीत ३१८ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेचे ६ महिने कंत्राटी तत्वावरील सन २०१३ पासून महानगरपालिकेत वेळोवेळी दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशानुसार कार्यरत ५६ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी व सन २०२० पासून वेळोवेळी दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशानुसार कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत ३१८ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी असे एकुण ३७४ विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१९/१०/२०२२ या १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन त्यांना ६ महिन्याकरीता दि.२०/१०/२०२२ ते दि.१९/०४/२०२३ पर्यंत पुर्वलक्षी प्रभावाने पुनर्नियुक्ती देणेबाबतच्या व तसेच त्यांच्या मानधनापोटी प्रति महिना रु.१,३०,०१,३५०/- व ६ महिन्याच्या मानधनापोटी रु.७,८०,०८,१००/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे. सदरचा मानधनापोटी होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात "रुग्णालय वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.५०,००,००,०००/- इतकी तरतुदीमधुन करण्यात येईल. तरी याबाबतच्या प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सादर.

**ठराव:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेचे ६ महिने कंत्राटी तत्वावरील सन २०१३ पासून महानगरपालिकेत वेळोवेळी दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशानुसार कार्यरत ५६ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी व सन २०२० पासून वेळोवेळी दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशानुसार कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत ३१८ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी असे एकुण ३७४ विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१९/१०/२०२२ या १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन त्यांना ६ महिन्याकरीता दि.२०/१०/२०२२ ते दि.१९/०४/२०२३ पर्यंत पुर्वलक्षी प्रभावाने तात्पुरत्या स्वरुपात करारनामा अटी-शर्तीच्या अधिन राहुन नेमणूक करण्यात येत आहे.

२) उक्त प्रस्तावात नमुद केलेले एकुण ३७४ विविध संवर्गातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि.२०/१०/२०२२ ते दि.१९/०४/२०२३ या ६ महिन्याच्या कालावधीसाठी त्यांच्या मानधनापोटी प्रति महिना रु.१,३०,०१,३५०/- व ६ महिन्याच्या मानधनापोटी रु.७,८०,०८,१००/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

23/01/23

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** १९८७

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- २३/०१/2023

---

**प्रस्तावाचा विषय :-** विरार-नालासोपारा-वसईरोड दरम्यान रेल्वे ट्रॅकवर ३ ठिकाणी कल्व्हर्ट बांधणे या कामाची उर्वरित रक्कम रेल्वे प्राधिकरणास अदा करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, जुलै, २०१८ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झाली. शहराच्या पूर्वेकडील पाणी पश्चिमेकडे वाहून नेण्यास रेल्वेट्रॅक खाली असलेल्या अस्तित्वातील कल्वर्टची संख्या कमी असल्याने पाण्याच्या प्रवाहस अडथळा निर्माण झाला. रेल्वे ट्रॅकवर पुराचे पाणी २-२.५ फुट जमा झाल्याने रेल्वे वाहतूक पुर्णपणे विस्कळीत झाली होती.

वसई विरार शहर महानगरपालिका अधिकारी व अन्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यां समवेत रेल्वे वरिष्ठ अधिकारी यांची दि.२४/०७/२०१८ रोजी भेट घेऊन संपूर्ण रेल्वे ट्रॅकची पाहणी केली. तसेच दि.१३/१२/२०१८ रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दि.१८/१२/२०१८ रोजी पत्र देऊन खालील रेल्वे कल्व्हर्ट बांधणे प्रस्तावित केलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | प्रत्यक्ष कामानुसार खर्च | मागणी केलेली फरक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कि.मी. ५६/१२-१३ नालासोपारा-विरार दरम्यान (नालासोपारा स्टेशन उत्तरेस) | रू.१२,४८,८०,२३३/- | -- | रू.१२,४८,८०,२३३/- | -- |
| २ | कि.मी. ५५/३-४ नालासोपारा-वसई रोड दरम्यान (नालासोपारा स्टेशन दक्षिणेस) | रू.२,०४,१३,८४३/- | रू.३,०२,१४,०११/- | रू.२,९१,९९,४१०/- | रू.८७,८५,५६७/- |
| ३ | कि.मी. ५२/२-३ वसई रोड-नालासोपारा दरम्यान (वसई स्टेशन रोड उत्तरेस) | रू.७,६५,११,३८३/- | रू.११,१७,०९,८१७/- | रू.८,४८,६४,१५४/- | रू.३,२२,३३,९६३/- |

उपरोक्त तिन्ही रेल्वे कल्व्हर्टच्या कामांची अंदाजित रक्कम रू.२२,१८,८५,४५९/- तसेच नियोजन व अंमलबजावणी चार्जेस रू.४१,९७,९७७/- रेल्वे प्राधिकरणाकडे भरणा करण्यास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०२ दि.२९/१२/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. (पृ क्र. )

रेल्वे विभागाकडे सदर कामी खालील प्रमाणे रक्कम भरणा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | नाव | धनादेश क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सिनीअर डिव्हिजनल फायनान्स मॅनेजर वेस्टर्न रेल्वे मुंबई सेंट्रल | "०१४९२०" | रू.२२,१८,८५,४५९/- |
| | | दि.०२/०१/२०१९ | |
| २ | | "०१४९२१" | रू.४१,९७,९७७/- |
| | | दि.०२/०१/२०१९ | |

सदरच्या ३ ठिकाणांपैकी अ.क्र. १ चे काम पुर्ण झाल्याचे तसेच उर्वरीत २ कामांसाठी महापालिकेने सूचविल्या नुसार कामात वाढ झाल्याने रेल्वे प्राधिकरणाने दि.२४/०८/२०२१ व दि.०२/०९/२०२१ अन्वये सदर कामांपोटी होणारा अंदाजीत खर्च रू.२,४९,२७,०७८/- च्या मागणीसह अस्तित्वाती पाणी पुरवठा जलवाहिन्या रेल्वे क्रॉसींग करीता प्रलंबीत वे लिव चार्जेस रू.४,१५,४५,३५०/- मागणी केली होती. (पृष्ठ क्र. )

दि.०४/०५/२०२१ रोजी रेल्वे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत अ.क्र.०७ ते १० ने तत्कालीन आयुक्त यांनी काही रक्कम भरणा करण्यास मान्यता दिली . (पृष्ठ क्र. )

मा. आयुक्त यांच्या निर्देशाप्रमाणे मुख्यालय बांधकाम / पाणीपुरवठा विभागाने वरील अ.क्र. १ व २ च्या कामांसाठी मागणी केलेल्या रू.२,४९,२७,०७८/- रक्कम पैकी रू.१,८७,८५,५६६/- इतकी रक्कम पश्चिम रेल्वे कडे भरणा करणे कामी सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय ठराव क्र.७८५ दि.२३/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. प्राप्त मान्यतेनुसार रू.१,८७,८५,५६६/- रक्कम (धनाकर्ष क्र.७३७६०९ व क्र.७३७६६१० दि.२४/११/२०२१) दि.२९/११/२०२१ च्या पत्रान्वये पश्चिम रेल्वेकडे भरणा करण्यात आली आहे.

दि.२९/११/२०२१ च्या पत्राने महापालिकेने कल्व्हर्ट बांधकामा अनुषंगाने रू.१,८७,८५,५६६/- पश्चिम रेल्वे विभागाकडे भरणा केले असता रेल्वे विभागाने यापुर्वी प्रलंबीत असलेल्या वे - लिव चार्जेस पोटी रक्कम वसूल करून घेतली आहे. वरील अ.क्र. २ व ३ च्या कल्व्हर्ट कामाच्या रक्कमेसह प्रलंबीत शिल्लक वे लिव चार्जेसची दि.१२/०९/२०२२ अन्वये मागणी केली आहे.

पश्चिम रेल्वेचे अधिकारी व महापालिका अभियंते यांची दि.२५/११/२०२२ रोजी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात बैठक संपन्न झाली त्यावेळी मा. आयुक्त यांनी वरील अ.क्र. २ व ३ मधील कामे सद्यस्थितीत पुर्ण झाली असल्यास एकत्रित संपुर्ण रक्कमेची मागणी पश्चिम रेल्वेने महापालिकेस सादर करावी त्यानूसार देयक अदा करण्यात येईल असा निर्णय घेलता. तसेच वे-लीव चार्जेस व इतर रेल्वेच्या विविध शुल्क/ विविध कामांसाठी आवश्यक निधी मागणीकरीता पश्चिम रेल्वेच्या त्या-त्या विभागांनी सुधारीत मागणी पत्र महापालिकेस सादर करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या.

विभागीय अभियंता (दक्षीण), पश्चिम रेल्वे, मुंबई सेन्ट्रल यांनी दि.०७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये वरील कल्वर्ट कामापैकी अ.क्र. २ व ३ मधील कामे पुर्ण झाली असून प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चानुसार यापुर्वी महापालिकेमार्फत अदा करण्यात आलेल्या रक्कमा वजा करता रू.४,१०,१९,५३०/- इतकी रक्कम पश्चिम रेल्वेकडे भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील "विकास विषयक कामांसाठी राखीव निधी" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुद रू.१४,६७,७५,१७९/- मधून सदर खर्च रू.४,१०,१९,५३०/- भागविणे शक्य आहे.

वरील प्रमाणे कल्व्हर्ट कामांसाठी रक्कम रू.४,१०,१९,५३०/- पश्चिम रेल्वेच्या मागणीनुसार भरणा करणे आवश्यक आहे. सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेस आहेत परंतू सद्यस्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणुक केली असल्याने सदरचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

तरी कल्व्हर्ट बांधकामासाठी पश्चिम रेल्वे विभागाने प्रत्यक्ष आलेल्या खर्चानुसार मागणी केलेली अंतिम रक्कम रू.४,१०,१९,५३०/- पश्चिम रेल्वेकडे भरणा करण्यासह पश्चिमरेल्वेच्या ट्रॅकखाली ३ नविन कल्वर्ट बांधकामासाठी आलेल्या एकूण रू.२६,७१,०२,९६६/- खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे सादर.

---

**ठराव :-**

१. महापालिका क्षेत्रात उद्भवलेल्या पुरपरिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून पश्चिम रेल्वेच्या ट्रॅकखाली ५६/१२-१३ कि.मी., ५५/३-४ कि.मी. व ५२/२-३ कि.मी. या ३ ठिकाणी पुर्ण ठेव तत्वावर कल्वर्ट बांधकामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ दि.२९/१२/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. पुरपरिस्थीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियुक्त केलेल्या अभ्यास संस्था नीरी व आय.आय.टी. मुंबई यांनी त्यांच्या अहवालात ३ ठिकाणी कल्वर्ट कामे करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

३. महापालिकेने ३ कल्वर्टच्या बांधकामासाठी यापुर्वी रू.२२,१८,८५,४५९/- व कामांचे नियोजन व अंमलबजावणी अनुषंगाने पश्चिम रेल्वे विभागास शुल्क रू.४१,९७,९७७/- दि.०२/०१/२०१९ रोजी भरणा केले आहेत.

४. दि.२५/११/२०२२ रोजी पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत वरील ३ कामांसाठी झालेला अंतिम खर्च महापालिकेस कळविण्यास सूचीत करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद अ.क्र. १ चे काम अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार पुर्ण झाल्याचे दि.०६/१०/२०२२ च्या पत्राने कळविले असून अ.क्र. ३ व ४ च्या कामांकरीता अनुक्रमे रू.८७,८५,५६७/- व रू.३,२२,३३,९६३/-इतकी वाढ झाली असल्याकारणाने एकूण रू.४,१०,१९,५३०/- रक्कम रेल्वे विभागाकडे भरणा करण्याबाबत दि.०७/१२/२०२२ च्या पत्रान्वये महापालिकेस कळविले आहे. सदरचा निधी पश्चिम रेल्वेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

५. वरील ३ कल्वर्टच्या कामांच्या अनुषंगाने याकामी आलेल्या वाढीव रू.४,१०,१९,५३०/- खर्चासह एकूण रू.२६,७१,०२,९६६/- च्या सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून पश्चिम रेल्वे कडे रू.४,१०,१९,५३०/- भरणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. पश्चिम रेल्वेकडून महापालिकेस येणे असलेली मालमत्ता करांतर्गत सेवाशुल्काची रू.१,२७,१३,५३६/- थकीत रक्कम व पाणीपट्टी कराची रू.३,६७,२००/- थकीत रक्कम अशी एकूण रू.१,३०,८०,७३६/- समायोजीत करण्याबाबत दि.२५/११/२०२२२ च्या बैठकीत सुचीत करण्यात आले आहे.

७. महापालिकेच्या अस्तित्वाती ८ जलवाहिन्या / मलजलवाहिन्या पश्चिम रेल्वेच्या ट्रॅक खालून क्रॉसींग अनुषंगाने रेल्वे विभागास वे-लीव चार्जेसपोटी रू.४,३२,९७,६८२/- भरणा करणे प्रस्तावित आहे. वरील महापालिकेस येणे असलेली रक्कम रू.१,३०,८०,७३६/- रेल्वे विभागाशी चर्चा / पत्रव्यवहार करून वे-लीव चार्जेस मधून अथवा वरील कल्वर्ट कामाच्या देयकातून समायोजीत करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका